प्रा·डॉ·सौ·व्ही·के·पाटील
मराठी विभाग प्रमुख,
छ·शिवाजी कॉलेज सातारा (महाराष्ट्र)
पिन - 415 001·

## प्र मा ण प त्र

सौ·सुमन सदाशिव निकम यांनी **"श्रीमती आशा बगे यांच्या कथांचा अभ्यास" ("अत्तर" व "चंदन" कथासंग्रहांच्या आधारे)"** या विषयावर माझ्या मार्गदर्शनाने हा लघु-शोध-प्रकल्प प्रबंधरूपाने स्वतःच पूर्ण केला आहे· हा शोध-प्रबंध विद्यापीठाच्या एम्·फिल्·पदवीसाठी सादर करण्यास मी अनुमती देत आहे· त्यांचे शोध-प्रबंधिकेचे काम पूर्णावस्थेत आहे व तो सादर करण्यास काहीही अडथळा नाही याची मला खात्री वाटते·

सातारा
२८/६/१९९६.

प्रा·डॉ·सौ·व्ही·के·पाटील
मार्गदर्शिका

PRINCIPAL M.K.YADAV
CHH.SHIVAJI COLLEGE,SATARA
(MAHARASHTRA)

## C E R T I F I C A T E

This is certify that Mrs.Suman Sadashiv Nikam, was a regular student of M.Phil.(Marathi) during the academic year 1994-95 and 1995-96. To the best of my knowldge she bears a good moral character.

Place : Satara.

Date : June,1996

Principal,
Chh.Shivaji College,
Satara.

# DECLARATION

It has hereby declared that the work reported in this Thesis is original and has not been previously submitted for any other Diploma in this or any other University.

(SOU.SUMAN SADASHIV NIKAM)

# प्रा स्ता वि क

श्रीमती आशा बगे यांच्या कथांचा अभ्यास ("अत्तर" व "चंदन" कथासंग्रहाच्या आधारे) हा विषय एम्·फिल्·च्या शोध-प्रबंधासाठी निवडण्यामागे मा·ल·रा·नसिराबादकर, मराठी विभाग (शिवाजी विद्यापीठ) तसेच मार्गदर्शिका डॉ·सौ·विमल पाटील यांच्याशी प्रत्यक्ष चर्चा करून मार्गदर्शन मिळाले व हा विषय निश्चित केला·

छत्रपती शिवाजी कॉलेजच्या ग्रंथालयात 1978 ते 1989 या कालावधीत नोकरी करीत असताना श्रीमती आशा बगे यांच्या कथा दिवाळी अंकातील व काही कथासंग्रह माझे वाचनात आले आणि त्या कथेतील भावविश्व, विषय यांच्याशी कुठेतरी जवळीक असल्याचे जाणवले· त्यांच्या कथेतील स्त्री समंजस वाटली· ती संस्कृतीशी, परंपरेशी जवळचे नाते असलेली असली तरी बदलत्या समाज वास्तवातील, कुटुंब व्यवस्थेतील बदलत्या मूल्यांची जाणीव ठेवणारी वाटली, व्यक्तिसंपन्न वाटली· तिला स्वतःची अशी वेगळी जाणीव, विचार करण्याची क्षमता आहे असे वाटले· ती बंडखोर नाही, पण नीतिनियमांच्या, परंपरेच्या विरोधी काही एक सीमेपर्यंत जाण्याची तयारी आहे· आशाबाईंच्या कथांतील स्त्री-पुरुष पात्रांचे मानसिक विश्व, त्यांची संवेदनशीलता यावर माझी दृष्टी खिळली· त्यांच्या कथा अनुभवावर, भावावस्थेवर केंद्रित झाल्याने, कुठेही उथळपणा नसल्याने मला त्यांच्या कथा भावल्या, मनापासून आवडल्या आणि कधीतरी त्यांच्या कथांचा अभ्यास करण्याची संधी मिळावी असे मनापासून वाटत होते· आता संशोधनाच्या रूपातून ती प्रकट झाली·

कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या रयत शिक्षण संस्थेत माझे सर्व शिक्षण झाले, या थोर महात्म्याच्या "कमवा आणि शिका" "स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद" ही उक्ती माझ्या मनात अगदी खोलवर रुजली आहे· नोकरी करीत करीत मी माझे एम्·ए·(मराठी), एम्·ए·(संस्कृत) एम्·एड·पर्यंत शिक्षण पूर्ण केले आहे आणि

आता एम्·फिल्·साठीही माझ्या महाविद्यालयीन गुरू प्रा·डॉ·सौ·विमला पाटील या मार्गदर्शक म्हणून लाभल्या आहेत· प्रस्तुत विषयाच्या सुरूवातीपासून ते प्रबंधिकेला पूर्णत्व देण्यापर्यंत आदरणीय व माननीय मार्गदर्शिका सौ·विमला पाटील यांचे सहकार्य लाभले· त्यांच्या गोड स्वभावामुळे व प्रोत्साहन देण्याच्या वृत्तीमुळे माझे संशोधनाच्या कामात अडचण आली नाही, त्यांची सदैव ऋणी राहणे हे मी माझे सद्‌भाग्यच समजते·

शोध-निबंधाचा अभ्यास करताना माझ्या स्नेही सौ·ज्योत्स्नाताई कोल्हटकर यांची मला खूपच मदत मिळाली· त्यांच्यामुळे सातारा नगर वाचनालयाच्या ग्रंथपाल व स्टाफचे सहकार्य मिळाले· सातारा येथील छ·शिवाजी कॉलेजचे ग्रंथपाल श्री·गायकवाड बी·एस·, ग्रंथालयीन सेवक वर्ग, श्री·अनिल दुडे व कार्यालयीन सेवक वर्ग यांची सतत मदत मिळाली·

"ललित" मासिकाचे श्री·अशोक कोठावळे, प्रा·डॉ·तारा भवाळकर यांनीही मला पत्राद्वारे मार्गदर्शन केले· या सर्वांचे ऋण न फिटण्यासारखे आहे·

लग्नानंतरही माझ्या शिक्षण घेण्याच्या आवडीच्या आड न येणारे, सतत प्रोत्साहन देणारे माझे पती, सासूबाई, श्री·पी·के·देसाई – वडील इ·चे मी सदैव ऋणी राहणे पसंत करते· कारण यांचा विरोध असता तर मी काहीच करू शकले नसते· प्रा·पी·ए·काटकर, प्रा·बाळासाहेब चव्हाण यांची मदत मिळाली· प्रा·डॉ·सौ·सुमन पाटील,मराठी विभागप्रमुख,सद्‌गुरू गाडगे महाराज कॉलेज कराड, मा·प्राचार्य मा·के·यादव, छ·शिवाजी कॉलेज सातारा, मा·रजिस्ट्रार श्री·शेवाळे, अधिक्षक श्री·देशमुख के·के·, प्रा·डॉ·एस·व्ही·पाटील यांचे मार्गदर्शन मिळाल्याने त्या सर्वांची मी आभारी आहे·

या प्रबंधाचे अत्यंत तत्परतेने टंकलेखन व बांधणी करून देणारे "रिलॅक्स सायक्लोस्टायलिंग सातारा"चे श्री·मुकुंद ढवळे आणि त्यांचे सहकारी श्री·सुशीलकुमार कांबळे यांचीही मी आभारी आहे·

# भूमिका

कथावाङ्‌मय क्षेत्रात, कथेच्या वाटचालीत एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभीपासून आजपर्यंत अनेक स्त्रीलेखिकांनी मोलाची भर घातलेली आहे. विभावरी शिरूरकर, आनंदीबाई, गिरिजाबाई, लक्ष्मीबाई टिळक, गीता साने, मनोरमा रानडे या स्त्रीलेखिकांनी कथांमधून प्रेमनिष्ठा, समंजसपणा, समर्पणशीलता या गुणांची संसारात गरज असते हे सातत्याने सांगितले होते. तर अलिकडच्या काळातील स्त्रीलेखिका शिरीष पै, वसुंधरा पटवर्धन, शांता शेळके, ज्योत्सना देवधर, सरिता पदकी, मोहिनी वर्दे, शैलजा राजे, गौरी देशपांडे, सानिया, प्रिया तेंडुलकर आशा बगे यांनीही वाङ्‌मयाचे अनेक प्रकार कौशल्याने हाताळले आहेत. किंबहुना स्त्रीलेखिकांनी कथेशी अत्यंतिक जवळीकतेचे नाते जोडले आहे हे दिसून येते. त्यात आधुनिक काळातील श्रीमती आशा बगे यांच्यासारखी स्त्रीलेखिका सातत्याने लिहीत असताना आपल्या कथाविश्वातून स्त्रियांच्या विविध स्वभावदर्शनाचा नैसर्गिकपणे उलगडा करताना दिसून येतात. म्हणून त्यांच्या कथेकडे विविध भूमिकेने पाहून त्यांच्या कथा चिकित्सक दृष्टीने तपासून घेऊन कथाविश्वात त्यांचे स्थान कोणत्या स्तरावर आहे, याचा शोध घेण्याचा प्रयत्न करण्याचा मानस आहे.

श्रीमती आशा बगे यांच्या दिवाळी अंकातून प्रसिध्द झालेल्या कथा व विविध कथासंग्रहातील कथा पडताळता त्यात दीर्घकथांचे प्रमाण जास्त जाणवले. त्यांनी हा फॉर्म का निवडला याचा शोध घेण्याचाप्रयत्न महत्त्वाचा ठरणारा आहे. त्यांच्या "अत्तर" व "चंदन" या दोन कथासंग्रहामधून येणाऱ्या बारा कथांचा चिकित्सक दृष्टीने अभ्यास करण्याचा प्रामाणिक प्रयत्न आहे. या कथांचा अभ्यास म्हणजे आशा बगेंच्या एकूण साहित्यामध्ये प्रकटणाऱ्या वैशिष्ट्यांचा स्वच्छ आरसा दिसत असल्यामुळे या मर्यादित कथांच्या आधारे ही लेखिका आपल्याला समजून घेता येईल. या कथामधून येणारी व्यक्तिचित्रणे, संवादकौशल्य, भाषाशैली, निसर्गवर्णन या वाङ्‌मयीन वैशिष्ट्यांचा शोध घेण्याचा मानस आहे. त्यांच्या कथांमध्ये आलेले स्त्री-पुरूष संबंध, भावनिक आंदोलने,

आई व मुलगी यांचे नाते, स्त्रीपात्रे, विदर्भ नागपूरकडील पार्श्वभूमीवर घडलेल्या घटनांचा बारकाईने चिकित्सकपणे अभ्यास करण्याचा प्रयत्न राहणार आहे· आशाबाईंचे व्यक्तिमत्व, वाड्·मयीन व्यक्तिमत्व यांचा शोध घेण्याचा मानस आहे·

आशाबाईंच्या कथेमध्ये जवळ जवळ प्रत्येक कथेमध्येच एखादी तरी वृध्द व्यक्ती असते आणि तिच्या तोंडी एखादी काव्यपंक्ती, ओवी, श्लोक किंवा नाट्यगीतातील एखादे पद गुणगुणत असल्याचे जाणवते हे असे का घडते ? याचाही शोध घेण्याचा मानस आहे· त्यांच्या कथेत येणारी पात्रे दलित वर्गातली, समाजाच्या तळागाळातली, ग्रामीण जीवनातली किंवा आर्थिकदृष्ट्या मागासलेली का नसतात ? एकत्र कुटुंबातील वातावरणच कसे कथेत येते ? विभक्त कुटुंब जास्त करून का येत नाही· पार्श्वभूमी म्हणून विदर्भ-नागपूरकडीलच वातावरण, प्रादेशिकताच का येते ? अशा विविध प्रश्नांची उकल करण्याचा प्रयत्न केला आहे·

श्रीमती आशा बगे यांच्या कथांत आश्रय देणारे व आश्रित लोक, सरंजामशाहीतील वातावरण सतत कसे येत राहते ? समंजस, सुशिक्षित स्त्रिया, पतीचे घर किंवा पित्याचे घर याशिवाय तिस-या बिंदूच्या शोधात स्वतःच्या पायावर धडाडीने उभी राहणारी का नसते ? तिला कुणाची तरी आश्रित म्हणूनच जगावे का वाटते ? त्यांच्या कथेतील पात्रे सुखवस्तू कुटुंबातील नैतिक मूल्ये जपणारी व सामाजिक कौटुंबिक स्तरातील असून मानवी मन जाणून घेण्याची संवेदनशीलता कशी आहे ? इत्यादी प्रश्नांची उकल आशा बगेंच्या "अत्तर", "बंदिशाळा", "झोपाळ्यावर अभंग कातर", "निवडुंग", "पाहुणा", "नर्सिंगहोम", "महावस्त्र", "चंदन", "समुद्र", "श्राध्द", "एक पावसाळी संध्याकाळ", "वर्तमान" या कथांच्या आधारे करण्याचा मानस आहे· या कथांच्या आधारे साहित्यिक दृष्टीने सामाजिक दृष्टीने, वाड्·मयीन दृष्टीने परामर्श घेण्याचा मानस आहे· विषयांची विविधता, कथनाचा ओघ याबद्दल कथेच्या आशयाच्या अनुषंगाने विविध प्रश्नांची उकल करण्याचा, श्रीमती आशा बगे यांच्या कथासाहित्याबद्दल बारकाईने शोध घेण्याचा प्रयत्न महत्त्वाचा ठरणार आहे·

आजवर आशा बगेंच्या साहित्यावर विपुल लेखन केल्याचे कुठेही आढळून येत नाही· डॉ·तारा भवाळकर, प्रा·अविनाश सहस्त्रबुध्दे यांच्या अनुक्रमे बहिणाई

दिवाळी अंक 96 व ललित अंक सप्टेबर 1989, दिवाळी अंक 1992, आशाबाईंनी स्वतः लिहिलेला लेख, 66 वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन स्मरणिका इ. त्यामुळे आपण काही संशोधन करावे अशी गरज वाटली.

श्रीमती आशा बगेंच्याविविधांगी अभ्यास करीत असताना कथालेखिका म्हणून स्वतःला काय वाटते ? आणि एकंदरीत साहित्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन काय आहे ? लेखनानुभवाविषयी काय वाटते ? विशिष्ट असे कथालेखनासाठी प्रयोग स्वतंत्र वापरले आहे का ? जास्त करून स्त्रियांचेच अनुभवविश्व का साकारले आहे ? यासाठी खास प्रश्नावली निर्मिती करून त्याआधारे या प्रश्नांची उत्तरे मिळविण्याचा, त्यांचा वाङ्‌मयीन दृष्टिकोन समजावून घेण्यास पुरेसे ठरणार आहे. त्यांचे भावी संकल्पही समजावून घेता येतील. यादृष्टीने प्रश्नावलीच्या रूपाने मिळणारी माहितीसुध्दा "शोध-प्रबंधा"स उपकारक ठरेल.

या शोध-प्रबंधास डॉ. अंजली सोमण यांचे "मराठी कथेची स्थितिगती, प्रा. म. ना. अदवंत यांचे "मराठी लघुकथेचा इतिहास 1808 ते 1960", म. द. हातकणंगलेकर यांचा "प्रदक्षिणा" खंड-2 मधील लेख, "स्वातंत्र्योत्तर काळातील मराठी कथा, ललित अंक 89,92, बहिणाई अंक इ. ग्रंथ संदर्भग्रंथ म्हणून उपयुक्त ठरणार आहेत.

परिशिष्ठामध्ये श्रीमती आशा बगे यांचा परिचय, त्यांना मिळालेले पुरस्कार, त्यांची लेखन संपदा, मुलाखत, हस्ताक्षर, फोटो या बाबी नोंदवल्या आहेत.

प्रबंधिकेच्या शेवटी संदर्भग्रंथाची सूची दिलेली आहे. वरीलप्रमाणे शोध-निबंधात परिपूर्णता आणण्याचा मी कसोशीने व प्रामाणिकपणे प्रयत्न केला आहे.